# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ११/०८/२०१८**

## १)घरफोडी :-

**किनवट :-** दिनांक ०९.०८.२०१८ चे २३.३० ते दिनांक १०.०८.२०१८ चे ०७.०० वा. चे दरम्यान श्री समर्थ ड्रेसेस दुकान किनवट नांदेड येथे, यातील अज्ञात आरोपीने श्री समर्थ ड्रेसेस दुकानाचे कुलूप काडुन शटर तोडुन अंदाजे ३०,१४६/-रुपयाचे रेडिमेड कपडे व नगदी १,०००/-रु असा एकुण ३१,१४६/-रुपयाचा माल चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी गणेश पांडुरंग फाजगे, वय २९ वर्षे व्यवसाय व्यापार रा. गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. किनवट** गुरनं १८४/२०१८ कलम ४५७,३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/चिते, मो.क्र. ९०११२०२८१४** हे करीत आहेत.

## २) जनावर चोरी

**उस्माननगर :-** दिनांक ०९.०८.२०१८ चे २२.०० ते १०.०२.२०१८ चे ०५.०० वा. चे दरम्यान फिर्यादीचे शेताचे आखाडयावरुन मौजे हिंदोळा, ता. लोहा जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी चे शेतातील आखाडयावरुन एक म्हैस किंमती ५०,०००/-रुपयाची छोटा हाती क्रमांक एम. एच.-२६/एच-३४२२ मध्ये घालुन घेवुन चोरुन नेत असताना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी आनंदा नारायण जाधव, वय ३८ वर्षे व्यवसाय शेती रा. हिंदोळा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. उस्माननगर** गुरनं १२६/२०१८ कलम ३७९, ३४, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/ मो.नं. ८५५२०३१५६०** हे करीत आहेत.

## ३)सकल मराठा अंदोलना बाबत दाखल गुन्हयाची माहीती :-

**अ) कंधार :-** दिनांक ०९.०८.२०१८ रोजी चे १७.३० वा. चे सुमारास मुख्य बाजारपेठ कौठा ता. कंधार, जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन मराठा समाजाला आरक्षण मिळावे या करिता अंदोलन करीत असताना एका दुकानदाराने त्याचे इलेक्ट्रीक दुकान उघडल्याने त्यास बंद करण्यास सांगितले असता बंद करीत नाही असे म्हणल्याने आंदोलन कर्त्यांने दगडफेक करुन फिर्यादी व साक्षीदार यांचे डोके फोडुन दु:खापत केली. व अश्लील शिवीगाळ करुन मो. सा. क्रमांक एम. एचज-२६/ ए.ए. ८४९० हीचेवर दगडफेक करुन मोडतोड केली. एका इसमाची मो. सा. जाळली व मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी बालाजी माधवराव देशमुख, वय ३४ वर्षे व्यवसाय शेती जात वाणी रा. कौठा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. कंधार** गुरन २२८/२०१८ कलम १४३, १४४, १४७, १४९, ३२३, ३२४, ३३६, ४२७, २९४, ५०४, भादवी व सह कलम १३५ मु. पो. का. कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/ नांदगावकर, मो.क्र. ९०११०८८४१९** हे करीत आहेत.

**ब) लिंबगाव :-** दिनांक ०८.०८.२०१८ रोजी चे २०.०० वा. चे सुमारास मौ. पासदगाव येथील पुष्पाजंली माध्यमीक विदयालय समोर सार्वजनिक रोडवर ता. जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन मराठा समाजाला आरक्षण मिळावे या करिता अंदोलन कर्त्यानी बस क्रमांक एम. एच. ०७/सी-७४७१ ही थांबवुन तिचेवर दगडफेक करुन काचा फोडुन २०,०००/-रु चे नुकसान केले. व बस क्रमांक एम. एच. २० /बी. एल. ३५९८ हीच्या काचा फोडुन १५,०००/-रु चे नुकसान केले. व शासकीय कामात अडथळा निर्माण करुन एकुण ३५,०००/-रु चे शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी सुधाकर पि. हनमंतराव नावले, वय ४७ वर्षे व्यवसाय नौकरी बॅच क्रमांक १८३९२ ने. वसमत आगार जि. हिंगोली** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. लिंबगाव** गुरन ५५/२०१८ कलम १४३, १४७, १४९, ३३७, ३४१, ३५३, भादवी व सह ३, ४, सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रति. कायदा व कलम १३५ मु. पो. का. कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/ वड, मो.क्र. ७८८८१७०६१४** हे करीत आहेत.

**क) लिंबगाव :-** दिनांक १०.०८.२०१८ रोजी चे २०.०० वा. चे सुमारास मौ. पासदगाव साई बार समोर सार्वजनिक डांबरी रोडवर नांदेड ते मालेगाव, ता. जि. नांदेड येथे, याथील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन मराठा समाजाला आरक्षण मिळावे या करिता बस क्रमांक एम.एच.१४/जी.पी.-००२६ ही थांबवुन तिचेवर दगडफेक करुन काचा फोडुन १५,०००/-रु चे शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी सुनिल पांडुरंग खिलारे, वय २१ वर्षे व्यवसाय बसचालक बॅच क्रमांक ५८६ वसमत आगार जि. हिंगोली** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. लिंबगाव** गुरन ५६/२०१८ कलम ३३६, ३४१, ३५३, ३४, भादवी व सह ३, ४, सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रति. कायदा कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/कांबळे, मो.क्र. ९९२३४१३२४४** हे करीत आहेत.

## ४)विवाहितेचा छळ :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०१.०६.२०१० चे नंतर दोन वर्षानी सासरी व माहेरी आज पावेतो वेळ नक्की नाही मौ.आकोली व गुंडेगाव, जि. नांदेड येथे, यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी बाईस तुला मुलबाळ होत नाही, तु वांजोटी आहेस, तुला स्वयंपाक बरोबर करता येत नाही तु दिसायला चांगली नाहीस तुला बिमारी झाली आहे अशा विविध कारणास्तव तिचा शारिरीक व मानसिक छळ करुन तिचे नवऱ्याने दुसरे लग्न केले तु परवानगी दिली नाहीस तर तुला जिवंत सोडणार नाही म्हणून मारहाण केली व शिवीगाळ करुन उपाशी ठेवून छळ केला. वगैरे **२५ वर्षीय वय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** गुरनं. ३५८/२०१८ कलम ४९८(अ),४९४, ३२३,५०४, ५०६, ३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/पाटील, मो.क्र. ९७६७०७५४९७** हे करीत आहेत.

## ५) झन्नामना जुगार :-

**अ)ईस्लापूर :-** दिनांक १०.०८.२०१८ रोजी चे १५.४० वा. चे सुमारास मौ.जलधरा, ता.किनवट, जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या झन्नामना नावाचा पत्यावर पैसे लावून जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह ३३८० /- रुपयासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोउपनि- विक्रम पांडूरंग विठुबोने, ने.पो. स्टे. ईस्लापूर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. ईस्लापूर** गुरन. ४७/२०१८ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/विठुबोने मो.नं. ९६३७०६४१९४** हे करीत आहेत.

**ब)लोहा :-** दिनांक १०.०८.२०१८ रोजी चे १५.४० वा. चे सुमारास शिवाजी चौक लोहा, जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मुंबई नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह २०४० /- रुपयासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी सपोनि-वैजनाथ किशनराव मुंडे, ने. पो. स्टे. लोहा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. लोहा** गुरन. १२८/२०१८ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/४०८ केंद्रे मो.नं. ९७३०७२६३७८** हे करीत आहेत.

**क)भाग्यनगर :-** दिनांक १०.०८.२०१८ रोजी चे १८.४५ वा. चे सुमारास चंदनानी कॉम्पलेक्स समोर, तरोडा नाका नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा पत्यावर पैसे लावून जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह २७२० /- रुपयासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोउपनि- अनिता नामदेव चव्हाण, ने. पो. स्टे. भाग्यनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरन. २४७/२०१८ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/२०१४ शिरसाट, मो.नं. ९४२३३०६२४५** हे करीत आहेत.

## ६) बेकायदेशिररीत्या विदेशी दारू बाळगुन मिळुन आला :-

**कुंटूर :-** दिनांक १०.०८.२०१८ रोजी चे २१.४५ वा. चे सुमारास मौ.काहाळा खु. ता.नायगाव जि.नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिर रित्या देशी दारु किंमती ८४,८६४/-रुपयाचा माल ॲपे ॲटो क्रमांक एम एच २६ जी-४३८८ किं.अं.७०,०००/-रु चा असा एकुण १,५४,८६४/-रु चा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने वाहतुक करित असतांना स्वतःच्या ताब्यात बाळगलेले मिळुन आले, वगैरे **फिर्यादी पोउपनि-सुरेश सोपानराव बनसोडे, ने. पो. स्टे. रामतिर्थ** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. कुंटूर** गुरन १२६/२०१८ कलम ६५ (ई), ८३ महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/मरे, मो.क्र. ९५२७७३२१००** हे करीत आहेत.

## ७) गळफास घेवुन आकस्मात मृत्यु :-

**भाग्यनगर :-** दिनांक १०.०१.२०१८ रोजी चे १६.१५ वा. चे सुमारास खबर देणारेचे घरी, बोध्दीसत्वनगर, मालेगाव रोड नांदेड येथे, यातील **मयत नामे दिव्या विजय कांबळे, वय १८ वर्ष, व्यवसाय शिक्षण, रा.बोध्दीसत्वनगर, नांदेड** हिने अज्ञात कारणावरुन राहते घराचे सिलींग फॅनला साडीने बांधुन गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर अरविंद दिगांबरराव कांबळे, वय ४५ वर्ष, व्यवसाय चालक, रा.बोध्दीसत्वनगर, नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** आ.म्र. ३०/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.म्र. दाखल असुन **तपास पोना/२०९ मंगनाळे, मो.क्र. ८८०५०१३४८०** हे करीत आहेत**.**

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.

## प्रेस नोट

दिनांक ११.०८.२०१८

# पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण हद्दीत खुनाच्या गुन्हयातील आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

..........................................................................................................................

मा. पोलीस अधीक्षक श्री संजय जाधव साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक नांदेड श्री डॉ. अक्षय शिंदे साहेब, यांचे आदेशान्वये पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण येथील खुनातील आरोपी पकडणेकामी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नांदेड श्री राज्रेंद सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली पथकाची स्थापना करण्यात आली होती.

पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड श्री राजेंद्र सहाणे यांचे पथकातील सपोनि श्री विनोद दिघोरे, पोउपनि श्री सदानंद बाबुराव वाघमारे, पोउपनि श्री कल्याण नेहरकर व त्यांचे सोबतचे कर्मचारी यांनी पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण गु.र.नं. 176/18 कलम 302 भा.दं.वि. गुन्ह्यातील आरोपीस अटक केली. यातील आरोपी हा विटाची वाहतुक करणारा टेम्पो क्रं. MH 26 B 4319 चा चालक राहणार वाजेगांव असुन तो दिनांक 17-05-2018 रोजजी सदर टेम्पो मध्ये विट भरुन मुखेड येथे खेडेगांवात नेवुन विट उतरवुन परत येताना गाडीतील लेबरास नैसर्गिक विधी आल्याने चालकाने टेम्पो तुप्पा पाटीवर गोपाळ चावडी कडे जाणा—या रोडजवळ माहामार्गावर अपघात स्थितीत धोकादायक रित्या उभा केला होता. मयत तुप्पा पाटीकडे त्याचे मोटार सायकलवर येत असताना मयताची त्याची मोटार सायकल टेंम्पोचे मागे आदळुन धडकुन मयत खालीपडुन जागीच मरण पावला आहे. यातील आरोपीकडुन पोलीसांनी गुन्ह्यातील टेम्पो क्रं. MH 26 B 4319 जप्त करुन अरोपीस पुढील तपास कामी पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड श्री राजेंद्र सहाणे यांचे पथकातील पोउपनि सदानंद बाबुराव वाघमारे, पोउपनि कल्याण नेहरकर, सपोउपनि जसवंतसिंह शाहु, पोहेकॉ जांभळीकर, पोना पांगरीकर, पोशि बालाजी सातपुते, पोशि तानाजी येळगे, पोशि जावेद, पोशि/परदेशी, पोशि/टाक, चापोना/श्रीरामे यांनी केली आहे.

पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड

# प्रेस नोट

दिनांक ११.०८.२०१८

## स्थानिक गुन्हे शाखेने बनावट अग्निशस्त्र बाळगणा–या युवकास केले जेरबंद

..........................................................................................................................

मा. पोलीस अधीक्षक श्री संजय जाधव साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक नांदेड श्री डॉ. अक्षय शिंदे साहेब, यांचे आदेशान्वये अवैध धंदयावर कार्यवाही करणे कामी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नांदेड श्री राजेंद सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली पथकाची स्थापना करण्यात आली होती.

पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड श्री राजेंद्र सहाणे यांचे पथकातील सपोनि श्री विनोद दिघोरे, पोउपनि श्री सदानंद बाबुराव वाघमारे, पोउपनि श्री कल्याण नेहरकर व त्यांचे सोबतचे कर्मचारी यांनी दिनांक ०९.०८.२०१८ रोजी मराठा आरक्षण महाराष्ट्र बंद चे बंदोबस्त दरम्यान नांदेड शहरातील चौफाळा भागात पेट्रोलींग करत असताना चौफाळा परिसरात एक युवक आपले ताब्यात बनावटी एक एअर गन पिस्टल बाळगुन मिळुन आला. सदर काळात मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे शस्त्र बंदी आदेश लागु असताना यातील आरोपीने आपले ताब्यात बनावटी एअर पिस्टल बाळगुन मिळुन आला म्हणुन त्याचे कडुन बनावटी एअर पिस्टल जप्त करुन अरोपी विरुद्ध पोलीस ठाणे इतवारा येथे भारतीय हत्यार कायदा कलम ६/२८ अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस पुढील तपास कामी पोलीस ठाणे नांदेड इतवारा यांचे ताब्यात दिले आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड श्री राजेंद्र सहाणे यांचे पथकातील पोउपनि सदानंद बाबुराव वाघमारे, पोउपनि कल्याण नेहरकर, सपोउपनि जसवंतसिंह शाहु, पोहेकॉ जांभळीकर, पोना पांगरीकर, पोशि बालाजी सातपुते, पोशि तानाजी येळगे, पोशि जावेद, पोशि/परदेशी, पोशि/टाक, चापोना/श्रीरामे यांनी केली आहे.

पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड